# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## अर्थप्रशासन विभाग

---

## परिपत्रक

जा.क्र. अप्रवि/सेवार्थ/1419/2015 दिनांक :– 02/11/2015

विषय :– एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमध्ये वेतन देयके निर्गमित करण्याबाबत.

संदर्भ :– 1. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.–कृषि व पदुम विभाग क्र.कृषिवि 2012/प्र.क्र. 169/8–अे, दि. 23.11.2012

2. मा.सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण 10–11/प्र. 100/कोषा (प्र.–5), दिनांक 25 जूलै 2014

3. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.–कृषि व पदुम विभाग क्र.कृषिवि 2012/प्र.क्र. 169/8–अे दि. 26 ऑगस्ट 2014

संदर्भ क्र. 2 च्या पत्रानुसार महाराष्ट्र शासनाने या विद्यापीठास असे कळविले आहे की, एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमध्ये कस्टमाईज्ड व्हर्जनमध्ये मंजूर पदांची माहीती भरतांना संबंधित अधिकारी/कर्मचारी कार्यरत असलेल्या पदांची संख्या आणि प्रत्यक्षात प्रणालीत भरलेल्या या संदर्भातील संख्या यामध्ये तफावत आढळून येते. तरी आपण आपल्या आस्थापनेवर असलेली मंजूर पदे आणि प्रत्यक्षात एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमध्ये तयार करण्यात आलेली पदे यामध्ये काही तफावत आहे का याबाबतची माहीती मा. कुलसचिव कार्यालयास तसेच नियंत्रक कार्यालयास न चुकता लेखी स्वरूपात कळवावी.

या परिपत्रकाव्दारे सर्व विभाग प्रमुख, आहरण व संवितरण अधिकारी तसेच वेतन व लेखा अधिकारी, अकोला/नागपूर यांना कळविण्यात येते की, माहे **नोव्हेंबर 2015 च्या डिसेंबर 2015 मध्ये देय होणारे वेतन** एसएयु सेवार्थ प्रणालीमधून निर्गमित करावयाचे आहे.

याबाबत असे सुचित करण्यात येते की, डीडीओ लेवल–1 म्हणजे सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी आपल्या आस्थापनेवर असलेल्या सर्व

अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन दर महिन्याच्या 10 तारखेपर्यंत संबंधित वेतन व लेखाधिकारी अकोला/नागपूर यांच्याकडे एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीव्दारे Forward करण्यात यावे. या दिनांकानंतर Forward करण्यात आलेल्या वेतन पत्रकाबाबत विचार करण्यात येणार नाही. डीडीओ लेवल–2 म्हणजे वेतन व लेखाधिकारी अकोला/नागपूर यांना सुचित करण्यांत येते की, त्यांनी दर महिन्यात आपल्याकडे आलेल्या वेतन देयकात अंकेक्षण करून डीडीओ लेवल–3 म्हणजे नियंत्रक यांच्याकडे दर महिन्याच्या 15 तारखेच्या आत डीडीओ लेवल–3 म्हणजे नियंत्रकांच्या ID मध्ये Forward करण्यात यावे.

उपरोक्त कार्यपध्दतीने तथा विहीत कालावधीत कार्यवाही न केल्याचे आढळल्यास संबंधित आहरण व संवितरण अधिकारी तसेच त्यांच्या संबंधित वेतन व लेखाधिकारी अकोला/नागपूर यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

**याबाबत अडचण आल्यास नियंत्रक कार्यालयास Email व्दारे comptroller@pdkv.ac.in त्वरीत माहीती इंग्रजीमध्ये सादर करावी. तसेच खालील भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 9423429691 | 9881235721 | 9766320476 | 8087123657 | 7588962813 | 9156870021 |

Vr. No. 01
Date 02/11/2015

(स्वाक्षरी)
नियंत्रक
**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,**
**अकोला**

प्रतिलीपी :–
1. **मा. कुलगुरू**, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांचे स्विय सहाय्यक यांना माहीतीसाठी सविनय सादर.
2. **मा. कुलसचिव**, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहीतीसाठी
3. मा. सहसंचालक (सुधारणा) लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मंत्रालयासमोर, मुंबई.
4. वित्त सल्लागार, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भोसले नगर, पुणे.
5. **वेतन व लेखाधिकारी, अकोला/नागपूर यांनी आपल्या अधिनस्त असलेले सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांची वेतन देयके एसएयु सेवार्थ प्रणालीत विहीत कालावधीचे वेतन देयक तयार झाली किंवा नाही याची खात्री करून घ्यावी, नसल्यास ती विहीत कालावधीत तयार करून घेण्याकरीता योग्य ती कार्यवाही आपल्या स्तरावरून करावी.**
6. **सर्व विभाग प्रमुख/सर्व नियंत्रण अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांच्याकडून एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमध्ये वेतन देयके उपरोक्त पध्दतीनुसार तयार करून घेण्याकरीता आपल्या स्तरावरून कडक निर्देश देण्यात यावेत**